
9 NOV 2017 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘कर्तबगार महिलांचा ग्रंथरूपाने मागोवा हवा’

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

‘लोकसंख्येत महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असूनही त्यांची समाजात होणारी उपेक्षा ९० टक्क्यांइतकी आहे. त्यामुळे महिलांमधील कर्तृत्वाला उजेडात आणण्यासाठी महिलांनीच पुढाकार घेतला पाहिजे. विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा ग्रंथरूपाने मागोवा घेतल्यास तो अमूल्य ठेवा होईल’ असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कै. (श्रीमती) शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया' या विषयावर दोन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राच्या उदघाटनप्रसंगी ते



**शारदाबाई पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना डॉ. जयसिंगराव पवार. यावेळी नीलांबरी जगताप, डॉ. भारती पाटील, विजयाताई पाटील, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. अरुण भोसले व डॉ. विलास पवार.**

बोलत होते. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. पवार म्हणाले, ‘विमलाबाई बागल यांनी कोल्हापुरात महिलांसाठी हॉस्पिटल व्हावे म्हणून आमरण उपोषण केले. त्यामुळेच सावित्रीबाई फुले हॉस्पिटल उभे राहिले. आज त्यांच्या कार्याचा विसर पडला आहे. अशा विस्मृतीत गेलेल्या कोल्हापुरातील कर्तृत्ववान महिलांच्या कर्तबगारीला सलाम करण्यासाठी पुढे आले पाहिजे.

प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ‘स्त्रियांनी सर्व क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध केले आहे. क्रीडा क्षेत्रात महिलांचे प्रमाणही वाढत आहे. कर्तबगार महिलांच्या योगदानाचे संकलनासाठी प्रयत्न हवेत.’

शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. चर्चासत्रासाठी विजया पाटील. वसुधा पवार, डॉ. प्रमिला जरग यांची भाषणे झाली. डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. तर डॉ. निलांबरी जगताप यांनी आभार मानले. चर्चासत्रासाठी विजया पाटील, वसुधा पवार, दशरथ पारेकर, डॉ. विलास पवार, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, उदय गायकवाड, सूर्यकांत गायकवाड आदी उपस्थित होते. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

-9 NOV 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### जयसिंगराव पवार : विद्यापीठात 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया' विषयावर चर्चासत्र

# 'स्त्री' कल्याणासाठी स्त्रियांनीच पुढे यावे

**कोल्हापूर :** लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण आज बावन्न टक्क्यांहून अधिक असूनही त्यांची उपेक्षा नव्वद टक्के इतकी आहे. त्यामुळे स्त्री जातीच्या कल्याणासाठी स्त्रियांनीच पुढाकार घेतला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कै. (श्रीमती) शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्यावतीने 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया' या विषयावर दोनदिवसीय चर्चासत्र आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. जयसिंगराव पवार बोलत होते. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. पवार म्हणाले, थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढून समाजसुधारणेचा मजबूत पाया रचला. मुली शिकल्या पाहिजेत, असे समाजसुधारकांना वाटते. स्त्रियांचा इतिहास हा स्त्रियांनीच लिहिला पाहिजे. आपल्या इतिहासाची दुरुस्ती आपणच केली पाहिजे. रखमाबाईंची कन्या कृष्णाबाई केरूळकरांची शिक्षण प्रक्रिया म्हणजे महाराष्ट्रातील स्त्रियांचे साधनग्रंथ होते. शाहू महाराजांनी कृष्णाबाईंची कोल्हापूर राज्यातील पहिल्या मेडिकल ऑफिसर म्हणून नेमणूक केली. कृष्णाबाईंना पुढील शिक्षणासाठी शाहू महाराजांनी इंग्लंडला पाठविले. अशा कृष्णाबाई आपल्याला माहीतही नाहीत. कर्तबगार स्त्रिया आत्मचरित्र लिहीत नाहीत; ते लिहिले पाहिजे. आजच्या स्त्री संशोधक पिढीने इतिहासातील व वर्तमानातील विविध क्षेत्रांतील कर्तबगार स्त्रियांचा मागोवा घेतल्यास तो अमूल्य ठेवा होईल.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. जयसिंगराव पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. भारती पाटील उपस्थित होत्या.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, स्त्रियांनी सर्वच क्षेत्रांत कर्तृत्व सिद्ध केले आहे. क्रीडाक्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण कमी होते, पण तेही चित्र आता बदलत आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील सर्वच क्षेत्रांतील स्त्रियांच्या कर्तृत्वाचा विचार करता त्याचे ऑडिओ-व्हिज्युयल स्वरूपातही संकलन केल्यास पुढे ते सर्वांना मार्गदर्शक ठरू शकेल.

यावेळी डॉ.भारती पाटील यांनी स्वागत केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. चर्चासत्रासाठी विजयाताई पाटील, वसुधाताई पवार, दशरथ पारेकर, डॉ. विलास पवार, डॉ. प्रकाश पवार, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, उदय गायकवाड, सूर्यकांत गायकवाड उपस्थित होते.

9 NOV 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वकल्याणासाठी स्त्रियांनी पुढे यावे

## डॉ. जयसिंगराव पवार : शारदाबाई पवार अध्यासनतर्फे चर्चासत्र

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असूनही त्यांची उपेक्षा नव्वद टक्के इतकी आहे. त्यामुळे स्त्री जातीच्या कल्याणासाठी स्त्रियांनीच पुढाकार घेतला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया' या विषयावर दोनदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बीजभाषण करताना डॉ. जयसिंगराव पवार बोलत होते. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.




**कोल्हापूर : शारदाबाई पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी डॉ. जयसिंगराव पवार, नीलांबरी जगताप, भारती पाटील, विजयाताई पाटील, डी. टी. शिर्के, अरुण भोसले आदी.**

डॉ. पवार म्हणाले, थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढून समाज सुधारण्याचा मजबूत पाया रचला. मुली शिकल्या पाहिजेत, असे आजही समाजसुधारकांना वाटते. स्त्रियांचा इतिहास हा स्त्रियांनीच लिहिला पाहिजे. आपल्या इतिहासाची दुरुस्ती आपणच केली पाहिजे. विमलाबाई बागल यांनी कोल्हापूरमध्ये स्त्रियांचे हॉस्पिटल होण्यासाठी आमरण उपोषण केले होते. त्यामुळे स्त्रियांसाठी सावित्रीबाई फुले हॉस्पिटल इथे उभे राहिले. आज लोकांना त्यांच्या या कार्याचा विसर पडलेला आहे. १९६० साली विमलाबाई बागल यांना संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अध्यक्ष करण्यात आले होते. स्त्रिया पुरुषांपेक्षाही बुद्धिमान असतात. कर्तबगार स्त्रिया इतिहास घडवितात. कोल्हापूरचा इतिहास स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारा आहे. चौथ्या शिवाजी महाराजांच्या राणी आनंदीबाई यांना शिकवण्यासाठी पुण्याच्या मिचेलबाईंनी मूळच्या कोल्हापूरच्या असलेल्या रखमाबाईंच्या नावाची शिफारस केली. रखमाबाई केरुळकर कोल्हापूर राज्यातील पहिल्या नेटिव्ह एज्युकेशन ऑफिसर झाल्या.

डॉ. पवार पुढे म्हणाले, रखमाबाईंची कन्या कृष्णाबाई केरुळकरांची शिक्षण प्रक्रिया म्हणजे महाराष्ट्रातील स्त्रियांचे साधन ग्रंथ होते. शाहू महाराजांनी कृष्णाबाईंची कोल्हापूर राज्यातील पहिल्या मेडिकल ऑफिसर म्हणून नेमणूक केली. कृष्णाबाईंना पुढील शिक्षणासाठी शाहू महाराजांनी इंग्लंडला पाठविले. अशा कृष्णाबाई आपल्याला माहीतही नाहीत. कृष्णाबाईंनी आत्मचरित्र लिहिले नाही. कर्तबगार स्त्रिया आत्मचरित्र लिहित नाहीत; ते लिहिले पाहिजे. आजच्या स्त्री संशोधक पिढीने इतिहासातील व वर्तमानातील विविध क्षेत्रातील कर्तबगार स्त्रियांचा मागोवा घेतल्यास तो अमूल्य ठेवा होईल.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, स्त्रियांनी सर्व क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध केले आहे. डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. या चर्चासत्रासाठी विजयाताई पाटील, वसुधाताई पवार, दशरथ पारेकर, डॉ. विलास पवार, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, उदय गायकवाड, सूर्यकांत गायकवाड आदी उपस्थित होते.

9 NOV 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्रियांच्या पदरी आजही उपेक्षाच : डॉ. पवार

## शिवाजी विद्यापीठात श्रीमती शारदाबाई पवार अध्यासनातर्फे दोन दिवसीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. ८ : लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण आज ५२ टक्क्यांहून अधिक असूनही त्यांची उपेक्षा ९० टक्के इतकी आहे. त्यामुळे स्त्री जातीच्या कल्याणासाठी स्त्रियांनीच पुढाकार घेतला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया' या विषयावर दोन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. त्याच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पवार बोलत होते. अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. पवार म्हणाले, "थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढून समाज सुधारणेचा मजबूत पाया रचला. मुली शिकल्या पाहिजेत, असे आजही समाजसुधारकांना वाटते. स्त्रियांचा इतिहास हा स्त्रियांनीच लिहिला पाहिजे. आपल्या इतिहासाची दुरुस्ती आपणच केली पाहिजे. विमलाबाई बागल यांनी कोल्हापूरमध्ये स्त्रियांचे हॉस्पिटल होण्यासाठी बेमुदत उपोषण केले होते. त्यामुळे स्त्रियांसाठीचे सावित्रीबाई फुले हॉस्पिटल उभे राहिले. आज लोकांना त्यांच्या कार्याचा विसर पडलेला आहे. १९६० मध्ये विमलाबाई बागल यांना संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अध्यक्ष केले होते. स्त्रिया पुरुषांपेक्षाही बुद्धिमान असतात. कर्तबगार स्त्रिया इतिहास घडवितात. कोल्हापूरचा इतिहास स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारा आहे. चौथ्या शिवाजी महाराजांच्या राणी आनंदीबाई यांना



**कोल्हापूर : श्रीमती शारदाबाई पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना डॉ. जयसिंगराव पवार. डावीकडून नीलांबरी जगताप, डॉ. भारती पाटील, विजया पाटील, डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. अरुण भोसले, डॉ. विलास पवार.**

शिकवण्यासाठी पुण्याच्या मिचेलबाईंनी मूळच्या कोल्हापूरच्या असलेल्या रखमाबाईंच्या नावाची शिफारस केली. रखमाबाई केरुळकर कोल्हापूर राज्यातील पहिल्या नेटिव्ह एज्युकेशन ऑफिसर झाल्या."

डॉ. पवार म्हणाले, "रखमाबाईंची कन्या कृष्णाबाई केळवकर यांची शिक्षण प्रक्रिया म्हणजे महाराष्ट्रातील स्त्रियांचे साधन ग्रंथ होते. शाहू महाराजांनी कृष्णाबाईंची कोल्हापूर राज्यातील पहिल्या मेडिकल ऑफिसर म्हणून नेमणूक केली. कृष्णाबाईंना पुढील शिक्षणासाठी शाहू महाराजांनी इंग्लंडला पाठविले. कृष्णाबाईंनी आत्मचरित्र लिहिले नाही. कर्तबगार स्त्रिया आत्मचरित्र लिहीत नाहीत; ते लिहिले पाहिजे. आजच्या स्त्रीसंशोधक पिढीने इतिहासातील व वर्तमानातील कर्तबगार स्त्रियांचा मागोवा घेतल्यास तो अमूल्य ठेवा होईल."

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, "स्त्रियांनी सर्वच क्षेत्रांत कर्तृत्व सिद्ध केले आहे. क्रीडा क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण कमी होते; पण तेही चित्र बदलत आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील सर्वच क्षेत्रांतील स्त्रियांच्या कर्तृत्वाचा विचार करता त्याचे ऑडिओ- व्हिज्युअल स्वरूपातही संकलन केल्यास मार्गदर्शक ठरू शकेल."

डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. चर्चासत्रासाठी विजया पाटील, वसुधाताई पवार, दशरथ पारेकर, डॉ. विलास पवार, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, उदय गायकवाड, सूर्यकांत गायकवाड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 NOV 2017
लोकमत

# शिवाजी विद्यापीठामध्ये 'आवाज' कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने 'आवाज' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन केले आहे. दि. १७ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी पाच या वेळेत होणाऱ्या या तीनदिवसीय कार्यशाळेमध्ये आवाजनिर्मिती, उच्चार, आवाजातील चढउतार, जीभ, जबडा, गाल, डोळे, ओठ, घशाचे व्यायाम, बोलण्यानुसार हातवारे, देहबोली, माईक जजमेंट प्रात्यक्षिक, श्वासाचे व्यायाम, सिंहमुद्रा, नृत्य, इंप्रुव्हायझेशन यांचा समावेश आहे. या चर्चासत्रात वरील सर्व मुद्द्यांवर चर्चा होऊन प्रात्यक्षिक करून घेतले जाणार आहे. तरी सर्वांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्र. संचालक व विभागप्रमुख डॉ. सुमन बुवा यांनी केले आहे.